N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

## FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** चामोर्शी **Year (वर्ष):** 2019

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0403 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 24/10/2019 16:34 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): दरमियानी दिन

**Time Period** (कालावधी):

**Date From** (दिनांक पासून): 23/10/2019

**Date To** ( दिनांक पर्यंत): 24/10/2019

**Time From** (वेळेपासून): 16:07 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 11:30 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 24/10/2019 **Time** (वेळ): 16:31 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद 021 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 24/10/2019 16:31 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्तळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): चामोर्शी शहर , पोस्टेचामोर्शी स्टे डायरी कक्ष,चामोर्शी , 442603

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्धीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नांव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्रीमती सरीता विनोंद कुंभारे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती का नाव)

(c) **Date/Year of Birth** (जन्म 1989 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (अदा केल्याची तारीख):

**Place of Issue** (अदा केल्याची ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लालंडोगरी चामोर्शी ,चामोर्शी ,चामोर्शी,गडचिरोली,महाराष्ट्र,442603,भारत |
| 2 | स्थायी पता | लालंडोगरी चामोर्शी ,चामोर्शी ,चामोर्शी,गडचिरोली,महाराष्ट्र,442603,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिनेशकुमार रामेश्वर लिल्हारे | | | 1. पोउपनि पोलीस स्टेशन चामोर्शी , चामोर्शी ,चामोर्शी,गडचिरोली,महाराष्ट्र, भारत-442603 |
| 2 | चंद्रशेखर निलकंठ काकडे | | | 1. पोहवा/700 पोलीस स्टेशनचामोर्शी, चामोर्शी ,चामोर्शी,गडचिरोली,महाराष्ट्र, भारत-442603 |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पैसे नोटा | 10,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 10,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

फिर्याद दिनांक 24/10/2019मी श्रीमती सरिता विनोद कुंभारे, वय 30 वर्षे, जात- कैकाडी (एन. टी.) धंदा- मजुरी, रा. मु. पो. लालडोंगरी चामोर्शी, ता. चामोर्शी, जिल्हा गडचिरोली. मो. नं. 7666442993मी दिनांक 23/10/2019 रोजी पोलीस निरीक्षक श्री रवि गोपाळराव राजुलवार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. पोलीस निरीक्षक श्री रवि राजुलवार यांनी माझे सांगण्याप्रमाणे माझी तक्रार नोंदवून त्यावर माझा निषाणी आंगठा घेतला. मी नोंदवलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे. मला दोन मुली व दोन मुले आहेत. माझ्या पतीचा दोन वर्शापूर्वी मृत्यु झाल्याने त्यांचे पालन पोशण मी करीत आहे. मला शेती नाही व माझी प्रकृती बरी राहत नाही. त्यामुळे मी माझे मुलाबाळांचे पालन पोशण करण्याकरीता दारु विक्रीचा धंदा करुन उदरनिर्वाह करीत आहे. मला तारीख आठवत नाही. अंदाजे चार दिवसा अगोदर मी माझ्या घरी असतांना सायंकाळी 07.30 वाजताचे दरम्यान पोलीस स्टेशन चामोर्शी येथील पीएसआय श्री लिलारे, साहेब, बिट हवालदार श्री काकडे साहेब व त्यांचेसोबत दोन पोलीस त्यापैकी एक महीला पोलीस हे माझ्या घरी येवून मला म्हणाले की, तु नेहमी दारु विक्रीचा धंदा करतेस, परंतु महीन्याचे पैसे मला पाठवित नाही. असे म्हणून माझे घराची घरझडती घेतली. घरझडतीमध्ये 10 लिटर मोहाची दारु भरलेली कन मिळाली. तेव्हा मी साहेबांना विनंती केली की, साहेब मला लहान-लहान मुल आहेत. माझी प्रकृती पण बरी राहत नाही. मी दारु विकुन माझे मुलांचे पालन पोशण करते. माझ्यावर केस करु नका, मला माफ करा. अशि विनंती केली. परंतु माझे काहीही न ऐकता माझ्याकडे मिळून आलेली दारु सोबत घेवून गेले व मला 20/10/2019 रोजी पोलीस स्टेषन चामोर्षी येथे या म्हणाले. परंतु माझी प्रकृती बरी नसल्याने मी पोलीस स्टेषनला गेली नाही. त्यानंतर काल दिनांक 22/10/2019 रोजी मी माझ्या घरी हजर असतांना अंदाजे रात्री 09.00 वाजताचे दरम्यान पीएसआय लिलारे साहेब व हवालदार श्री काकडे साहेब हे माझे घरी आले. तेव्हा लिलारे साहेब मला म्हणाले की, तुम्ही दिनांक 23/10/2019 पोलीस स्टेषनला या व येतांना सोबत रु. 10,000/- घेवून या असे म्हणाले. तेव्हा मी साहेबांना विचारणा केली की, साहेब रु. 10,000/- कषाचे? मी काय केली. त्यावर काकडे, साहेब म्हणाले की, त्या दिवषी साहेबांनी तुझ्या घरुन दारु पकडली आहे. त्या पकडलेल्या दारुची केस करायची नसेल तर साहेबांना रु. 10,000/- दयावेच लागतील. नाहींतर आम्ही तुझ्यावर दारुची केस करतो. त्यावेळी मी श्री लीलारे, साहेब व काकडे साहेबांना

विनंती केली की, साहेब माझेवर केस करु नका, माझे मुलाबाळांचा विचार करा. असे म्हणाली तेव्हा श्री लिलारे साहेब म्हणाले की, तु पोलीस स्टेशनला पैसे घेवून ये. तेव्हा मी घाबरुन गुन्हा दाखल करतील या भिती पोटी ठिक आहे साहेब मी पैसे जमवून उदयाला आपणास पोलीस स्टेशनमध्ये भेटते. असे म्हणाली. तेव्हा श्री लिलारे, पीएसआय व काकडे हवालदार हे माझे घरुन निघून गेले. श्री लिलारे, पोलीस उपनिरीक्षक व श्री काकडे हवालदार, दोन्हीं पोलीस स्टेषन चामोर्शी, ता. चामोर्शी, जिल्हा गडचिरोली यांनी माझ्यावर दारुची केस न करण्याचे कामाकरीता 10,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी केलेली आहे. श्री लीलारे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन चामोर्शी, ता. चामोर्शी, जिल्हा गडचिरोली यांना 10,000/- रुपये लाच देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी 10,000/- रुपये घेऊन आपले कार्यालयामार्फत कार्यवाही होणेकरीता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे तक्रार देण्यास आली.श्री लिलारे, पोलीस उपनिरीक्षक व श्री काकडे हवालदार, दोन्हीं पोलीस स्टेषन चामोर्शी, ता. चामोर्शी, जिल्हा गडचिरोली यांचेशी माझा कोणताही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण-घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचे विरुध्द कायदेशिर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. मी सोबत आणलेले रु. 10,000/- हे माझे वैयक्तिक बचतीतील आहे. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री रवि राजुलवार यांनी 2 शासकिय पंचांना पाचारण केले. त्यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. श्री राजुलवार यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.त्यानंतर पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी व्हॉईस रेकॉर्डर कष्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 10,000/- (रू. 500/- दराच्या 20 चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखविले. तदनंतर लाचेच्या रक्कमेस अँथ्रसिन पावडर लावली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह श्री लिलारे, पोलीस उपनिरीक्षक व श्री काकडे हवालदार, दोन्हीं पोलीस स्टेषन चामोर्शी, ता. चामोर्शी, जिल्हा गडचिरोली यांचेकडे पोलीस स्टेषन चामोर्षी येथे जाण्यास रवाना केले. श्री लिलारे, पोलीस उपनिरीक्षक व श्री काकडे हवालदार, दोन्हीं पोलीस स्टेशन चामोर्शी, ता. चामोर्शी, जिल्हा गडचिरोली यांनी पोलीस स्टेषन चामोर्शी येथे पंच क्रं. 1 समक्ष माझेवर दारुची केस न करण्याचे कामाकरीता रू. 10,000/- (दहा हजार रूपये) लाच रकमेची मागणी करून उदयीक रोजी लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर मी पंच क्रं. 1 सह पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांचेकडे परत गेली असता पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. त्यानंतर सर्वानुमते उदया दिनांक 24/10/2019 रोजी सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत.आज दि. 24/10/2019 रोजी लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील शासकिय पंच, स्टाफ षासकिय वाहनाने मौजा चामोर्शी गावाचे अलीकडे पोहचले व माझेषी संपर्क करुन तिथे बोलावुन घेतले. त्यावेळी मला पंचासमक्ष अँथ्रसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम देण्यात आली. ती माझे जवळील स्कार्पमध्ये ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर पोलीस स्टेषनचे बाहेर दर्षनी भागी येवून आपले जवळील स्कार्पने चेहरा पुसावा हा इषारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इषारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगे हाथ पकडतील असे सांगण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह पोलीस स्टेषन चामोर्षी येथे जाण्यास रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. त्यानंतर मी व पंच क्रं. 1 पोलीस स्टेशन चामोर्शीचे आत गेली असता त्याठिकाणी श्री काकडे, हवालदार हे स्टेषन डायरी डयुटीवर हजर होते. त्यांनी मला त्यांचेसमोरील बाकडयावर बसण्यास सांगीतले. त्यानंतर पंच क्रं. 1 मोबाईल हरविल्याची तक्रार देण्याच्या बहाण्याने स्टेशन डायरी कक्षात आले व माझे बाजुला बसले. श्री काकडे, हवालदार यांच्या इशा-यावरून पंचासमक्ष मी त्यांना माझे स्कार्फमध्ये बांधुन ठेवलेली लाचेची रक्कम दिली. ती त्यांनी उजव्या हाताने घेवुन नंतर डाव्या हाताने आपल्या पंटच्या मागील डाव्या खिष्यामध्ये ठेवली. मी त्यांना मोजुन घेण्यास सांगीतले. परंतु ते मला म्हणाले कि, किराणा दुकाण होय का? मोजुन घ्यायले? यावर मी त्यांना म्हणाली, तुम्ही किती ठेवसाल? आणि मोठया साहेबांना किती देसाल? यावर ते म्हणाले, यातले 5 हजार देईल.त्यानंतर मी दर्शनी ठिकाणी येवुन सापळा पथकास माझे जवळील स्कार्फने चेहरा पुसुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने श्री काकडे, हवालदार यांना रंगेहात पकडले त्याचवेळी चामोर्षी पोलीस ठाण्यात हजर असलेले पोलीस उपनिरिक्षक श्री लिल्हारे यांनाही पकडुन पुढील कारवाई केली. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंचनामा क्रं. 3 मध्ये घेतल्या आहेत.तरी लोकसेवक क्रं. 1) श्री दिनेशकुमार रामेश्वर लिल्हारे, वय 34 वर्षे, पद पोलीस उपनिरिक्षक, पो.स्टे. चामोर्शी गडचिरोली रा.शहीद चेट्टीवार यांच्या घरी, गणेश नगर, मु.पो.ता. चामोशी, जि. गडचिरोली व लोकसेवक क्रं. 2) श्री चंद्रशेखर निळकंठ काकडे, वय 48 वर्षे, पद पोलीस हवालदार, ब.नं. 700, पो.स्टे. चामोर्शी गडचिरोली रा. हनुमान वार्ड, तहसिल ऑफिसजवळ, भुमि अभिलेख ऑफिससमोर, मु.पो.ता. चामोर्शी, जि. गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून माझे घरून 10 लिटर दारू पकडुन माझेवर दारूची केस न करण्याचे कामाकरिता संगनमत करून पंचासमक्ष रू. 10,000/- लाच रक्कमेची मागणी करून लोकसेवक क्रं. 2 श्री चंद्रशेखर काकडे, पद-पोलीस हवालदार, यांनी माझेकडुन पंचासमक्ष रू. 10,000/- लाच स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मला वाचुन दाखविण्यात आली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष( रवि जी. राजुलवार ) पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, गडचिरोली.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

**(1) Registered the case and took up the investigation: (**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):** **or**

**(2) Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे JITENDRA EKHANATH **Rank (**पद**):** I (Inspector)

**No.(**क्र.**):** POBN70652 **to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or**

**(3) Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

**(4) Transferred to P.S.(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**



**15.Date and time of dispatch to the court (**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station** **(**ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (**नाम**):** JITENDRA EKHANATH BORKAF
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** POBN70652

निशा जि. खोब्रागडे
म. पोलीस उपनिरीक्षक
पो. स्टे. चामोर्शी

पोलीस स्टेशन, चामोर्शी
सत्यमेव जयते
जि. गडचिरोली



**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे **(**माहित असलेल्या/पाहिलेल्या**)** शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील**))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**